# वाचकांचे मनोगत

स. न.

'बायजा' मधील 'मोक्ष की कपाळमोक्ष' हा श्री. रा. प. नेने यांचा लेख वाचला. या संदर्भात काही गोष्टी लक्षात घेणे जरूर आहे असे वाटते. संत वाङ्मयाचा अभ्यास तत्कालीन परिस्थितीच्या संदर्भात केला तर बऱ्याच गोष्टी स्पष्ट होतात.

१) ज्ञानेश्वराने परंपरेचे सामर्थ्य ओळखले होते. ज्ञानेश्वरांच्या पूर्वी जैन, लिंगायत, महानुभव यासारखे पंथ होते. परंतु त्यांनी परंपरा झुगारल्यामुळे ते बाजूला पडले. उलट ज्ञानेश्वरादी संतांनी या चौकटीतच राहून समाज एकात्म बनविण्याचा प्रयत्न केला.

२) लौकिक पातळीवर सामाजिक समता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न संतांनी केला काय असा प्रश्न लेखकाने उपस्थित केला आहे. विषमतेची नांगी ठेचून टाकण्यासाठी ज्ञानेश्वरांनी आपल्या अनुयायांना सतत समबुद्धीचा उपदेश केला. समतेचे तत्त्व अंतःकरणात भिनले की उच्चनीचतेच्या भ्रामक कल्पना नाहीशा होऊन समाजात स्नेहभावाचे व समरसतेचे वातावरण नांदू लागेल. 'तेथ अंतर बाह्य गेले। निर्मळत्व एक जाले। किंबहूना निर्वाळले। शुचित्वचि ॥' अशा प्रकारे सामाजिक जिवन निकोप व निरमय होईल असा ज्ञानेश्वरांचा आशावाद होता.

३) आज विसाव्या शतकात सुद्धा जातीय विषमतेचा कडू अनुभव आपल्याला घ्यावा लागत आहे. तर मग सातशे वर्षापूर्वी काय स्थिती असेल याची कल्पनाच केलेली बरी. तेव्हा कालाचे योग्य भान राखले तर संतांच्या कार्यावरील अपरिहार्य मर्यादा लक्षात घेऊन त्यांच्या कार्याची मौलिकता समजू शकेल.

४) संतांनी मानसिक सामंजस्यावर आधारलेल्या समतेचे बी पेरले, परंतु त्यांच्या वारसदारांनी त्याला खतपाणी घातले नाही. परिणामी रोपटे खुरटले. हा दोष कुणाचा ? तेव्हा आळंदीला दिंडी यात्रेत जे काही घडले त्याचे खापर संतावर फोडण्याचे काहीच कारण नाही. कोणत्याही सार्वजनिक संस्थेच्या बाबतीत जे घडते तेच दिंडी यात्रेच्या बाबतीत झाले आहे. संस्था उभारताना तिच्यासाठी ध्येयनिष्ठ लोक आपले जीवन वेचतात आणि कालांतराने तिच्यात स्वार्थी लोकांचा भरणा हो ो. आज कोणत्याही राजकीय संस्थेबद्दल जे दिसते तेच तत्त्व या धार्मिक संस्थेला लागू पडते. मला एवढेच म्हणायचे की दोष द्यायचा असेल तर तो संतांच्या अनुयायांना आणि दिंडी प्रमुखांना द्यावा, संतांना नको. इवलेसे रोप लावणाऱ्या संतांचा वेलू गगनात नेण्याची जबाबदारी आपणा सर्वांची आहे.

बायजाचा एक वाचक
ज्ञानेश्वर राजुरे

स. न.

'मोक्ष की कपाळमोक्ष' ('बायजा' वर्ष २ अंक ४) या लेखावरील श्री ज्ञानेश्वर राजुरे यांची प्रतिक्रिया वाचली. वाचकांशी विचार विनिमय करण्याच्या दृष्टीने खालील मुद्दे मांडीत आहे.

१) बौद्ध, जैन, लिंगायत, महानुभव इत्यादी धर्मांना अथवा पंथांना आपल्या देशात मर्यादित यश का मिळाले याची चर्चा आवश्यक करावयास पाहिजे. परंतु परंपरा झुगारून दिली की नेहमी अपयश येते आणि म्हणून परंपरा झुगारून देऊ नये असे मानणे मात्र बरोबर ठरणार नाही. खुद्द ज्ञानेश्वर यांनी व त्यांच्या मागोमाग इतर संतांनी संस्कृत भाषेच्या वर्चस्वाची व अनेकविध पारंपारिक व्रतवैकल्याची परंपरा झुगारुन दिली. त्यामुळे ते लोकप्रिय झाले की बाजूला पडले ? त्याच्याही पूर्वीच्या काळात गेल्यास, पशुबलीने सांगता करण्याची यज्ञाचो परंपरा खंडित करण्यात आली. यात काही वाईट झाले का ? किंबहुना काही काळ बाजूला पडावे लागले तरी चालेल, प्रतिकूल लोकमताचे अघात सहन करावे लागले तरी चालतील, परंतु परंपरेतील त्याज्यांश जे असेल ते गाडून टाकण्याचे धैर्य अंगी बाणावे लागते. काळ व परिस्थिती जर परिपक्क नसेल, तर परंपरेविरुद्ध केलेल्या संघर्षाला त्या काळात यश येतेच असे नाही. परंतु अशाही वेळेस सनातन परंपरेच्या पताका फडकवणाऱ्यांपेक्षा विद्रोहाचा झेंडा रोवण्याचा प्रयत्न करणारेच श्रेष्ठ ठरत असतात.

२) संतांनी जो समबुद्धीचा उपदेश केला, त्यात विहीत कर्मानुसार करावयाच्या कर्तव्यापासून सुटका नव्हती. किंबहूना ते कर्तव्य करणे म्हणजेच आदर्श नीतीमय जीवन जगणे असे मानले गेले होते. त्यामुळे अंगमेहनतीचे श्रम न करिता, मोबदला घेणे (म्हणजेच दान) हे ब्राह्मणाचे कर्तव्य ठरले आणि गाववेशीच्या बाहेर राहून सर्वांची रात्रंदिवस सेवा करणे, आणि ती करीत असताना आपण अमंगळ आहोत असे मानणे हे महाराचे कर्तव्य ठरले. आता यांच्यातील 'धर्मांतरी अधर्म' कोणत्याच संतांना कधी जाणवला नाही असे झाले नाही. उलट तो जाणवला म्हणूनच व्यावहारिक जीवनात सदाचारावर भर देऊन अमूर्त पातळीवर भक्तीच्या मार्गाने सर्वांना परमेश्वर प्राप्त करून घेता येतो असे त्यांनी मांडले. अफूच्या गोळीने काही काळ भूक, थंडी इत्यादी दुःखे भासेनाशी होतात पण ती नष्ट होत नाहीत हे जर आपण लक्षात घेतले तर जे श्रेय अफूच्या गोळीला आहे तेच श्रेय संतांच्या शिकवणुकीला आहे हे पटावयास हरकत असू नये.

संतांच्या अनुयायांनी संतांच्या शिकवणुकीचा विपर्यास केला म्हणून आज समाजात सामाजिक विषमता दिसते असे श्री. राजुरे यांचे म्हणणे आहे. परंतु वस्तुतः बुद्ध अथवा चक्रधरांसारख्यांचे अपुरे राहिलेले कार्य त्यातील उणीवा दूर करून, पुढे नेण्याचे ऐवजी, परधर्म भयावह आहे, म्हणजेच जन्मकर्माधिष्ठित आचारा व्यतिरिक्त अन्य आचार हा भयावह आहे या भगवद्गीतेने घातलेल्या धमकीपुढे संत शरण गेले. यामुळे व आधुनिक आर्थिक-राजकीय घडामोडींमुळे आज आपल्याला कोठे शिरसगाव घडलेले दिसते, तर कोठे आळंदी घडते अशी परिस्थिती आहे.

सारांश, संतांनी आपल्या स्वतःच्या काळात केलेल्या कार्याचा यथोचित गौरव करिताना जे कार्य ते करू शकले नाहीत त्याचे श्रेय त्यांना देण्याची गरज नाही. केवळ परिस्थितीच त्यांच्या याबाबतच्या अगतिकतेला कारणीभूत होती असे मानावयाचे असेल तर त्यांना अपश्रेयही देण्याचे कारण उरत नाही. परंतु त्यांच्या शिकवणुकीच्या आशयावर रंगसफेती करून आधुनिक समताधिष्ठित समाज प्रस्थापित करता येईल अशी समजूत करून घेणे हे योग्य ठरणार नाही. 'भेदाभेद अमंगळ' म्हणणाऱ्या संतांना सामाजिक भेद भेदून काढता आले नाहीत. या बीजाचा वृक्ष वाढू देणे समर्थनीय ठरेल काय ?

– रा. प. नेने

---

## स्त्रियांच्या चळवळी

स्त्रियांकरिता चळवळी आज बऱ्याच अंशी पुरुषच करीत आहेत. स्त्रियांसाठी स्त्रिया चळवळी करू लागल्या नाहीत. त्यामुळे स्त्रियांचे खरे वाङमय पैदा होऊ लागले नाही. काही दिवसांमागे साधारणपणे असा नियम होता की, स्त्रियांनी सामाजिक परिषदातून बोलावयाचे किंवा मासिकातून लिहावयाचे, म्हणजे ते केवळ स्त्री शिक्षण व पुनर्विवाह ह्याच विषयावर. जणू काय स्त्रियांनी दुसऱ्या कोणत्याही विषयावर बोलूच नये. स्त्रियांच्या विचारांचे क्षेत्रनियमन ह्याप्रमाणे पुरुष करीत होते.

महाराष्ट्रातील स्त्रियांनी धैर्याने पुढे जाऊन आता आपली चळवळ आपल्या हाती घेतली पाहिजे. त्यांनी आपल्या उन्नतीविषयी स्वतंत्रपणे विचार केला पाहिजे. स्त्रियांची स्थिती सुधारण्यासाठी कायद्यात काय दुरुस्त्या करावयाच्या हे स्त्रियांनीच सुचविले पाहिजे. स्त्रियांनी आपले डोके सामाजिक प्रश्नात घातले तर समाजसुधारणेची उपयुक्त पुरवणी करण्याचे श्रेय त्यांना मिळेल. देशाच्या उन्नतिक्रमात आम्हास स्वतंत्र विचाराच्या स्त्रिया पाहिजेत. स्त्रियांचे कैवारी जे पुरुष असतील त्यांच्या मतास हो करणाऱ्याच स्त्रिया नको आहेत. त्यांनी स्वतंत्रपणे विचार करण्याचा व चळवळ करण्याचा उपक्रम केला नाही, तर स्त्री शिक्षणाचे सार्थक झाले नाही असे मी समजेन. स्त्रियांनी केवळ स्त्रियांसंबंधाच्याच प्रश्नात लक्ष घालावे असे नाही. त्यांनी अनेक व्यापक व सामाजिक प्रश्नांकडे पाहिले पाहिजे. समाजापुढे येणाऱ्या प्रत्येक प्रश्नावर विचार करणाऱ्या स्त्रिया आमच्यात असल्या पाहिजेत व तशा असल्या तरच त्यास जे राजकीय हक्क मिळाले आहेत, त्यांचे समर्थन होईल.

— श्रीधर व्यंकटेश केतकर

एप्रिल १९२५, विद्यासेवक मासिकातील लेखातून